# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०१८/५१/१९५६-अ
दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५
फॅक्स : ०२२-२६६७७६६६
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : १५ डिसेंबर,२०१८.

## परिपत्रक

विषय : चित्रपटगृहांना मान्यतेचा प्रस्ताव सादर करताना संचालक, अग्निशमन सेवा, महाराष्ट्र शासन यांचे अग्निशमन प्रमाणपत्र सादर करणेबाबत..

संदर्भ : १. शासन पत्र, गृह विकास यांचे पत्र क्र.बीसीआर-०२१८/प्र.क्र.४५/विशा-५, दिनांक २८.०२.२०१८.
२. या संचालनालयाचं पत्र क्र.मअसे-२०१८/५१/५६९, दि.१०.०४.२०१८

शासन पत्र, गृह विकास यांचे पत्र क्र.बीसीआर-०२१८/प्र.क्र.४५/विशा-५, दिनांक २८.०२.२०१८ अन्वये गृह विभागाने महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम,१९६६ मधील नियम १०० खाली परवाना प्राधिकारी यांचेकडून परवाना देण्यासाठी संबंधीत चित्रपट गृहांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांबाबत ना हरकत प्रमाणपत्र संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

०२. यासंदर्भात सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम,१९६६ मधील नियम १०० नुसार परवाना प्राधिकारी यांचेकडून परवाना देण्यासाठी नव्याने बांधण्यात येणा-या चित्रपट गृहांकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ नुसार बांधकाम करण्यापूर्वी अग्निशमनाचा तात्पुरता ना हरकत प्रमाणपत्र (Provisional Fire NOC) स्थानिक अग्निशमन दल तसेच या संचालनालयाकडून घेणे आवश्यक आहेत. तसेच चित्रपट गृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भागवटा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अंतिम ना हरकत प्रमाणपत्र (Final Fire NOC) स्थानिक अग्निशमन दल तसेच या संचालनालयाकडून घेण्यात यावे.

०३. महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम,१९६६ मधील नियम १०५ खाली परवाना प्राधिकारी यांचेकडून परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी चित्रपट गृहांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्याचे प्रस्ताव या संचालनालयास सादर न करता स्थानिक अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. ज्या महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्रात सक्षम अग्निशमन अधिकारी उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणच्या चित्रपट गृहांचे नुतनीकरण करण्यासाठी चित्रपट गृहांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्याचे प्रस्ताव या संचालनालयास सादर करण्यात यावेत.

आपला विश्वासू,

**(डॉ.प्र.सु.रहांगदळे)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती.
सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

कृ.मा.प.

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०००३०.

मा.सचिव, गृह विभाग, मुख्य इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

सर्व जिल्हाधिकारी.

मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवा.